जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 JAN 2024 सकाळ

# ‘मणिपुरी ब्लॅक राईस’वर विद्यापीठात यशस्वी संशोधन

## कालावधी, उंची कमी केल्याने उत्पादनात वाढ; सुगंध, चव, रंग कायम

रिसर्च स्टोरी

ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : मणिपूरमधील ‘ब्लॅक राईस’ आणि पुणे, नगर जिल्ह्यांतील ‘काळ भात’ या दोन वाणांवर शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाने संशोधन केले आहे. या संशोधनानंतर या वाणांचा कालावधी कमी झाला असून, त्याच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. याच्या चाचण्या यशस्वी झाल्या असून, पुढील टप्प्यातील चाचण्यांनंतर हे वाण शेतकऱ्यांना दिले जाईल. यापूर्वी वनस्पतीशास्त्र विभागाने आजरा घनसाळ आणि काळा जिरगा यावरील यशस्वी संशोधन करून त्यांची उत्पादकता वाढवली आहे.

भाताची अनेक देशी वाण राज्याच्या वेगवेगळ्या भागात आढळतात; मात्र त्यांचे उत्पादन अन्य विकसित केलेल्या वाणांच्या तुलनेत कमी असल्याने देशी वाणांचे उत्पादन व्यावसायिक तत्त्वावर फारसे होत नाही. देशी वाणांचे संवर्धन करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभागाने त्यावर संशोधन केले आहे. यामध्ये त्यांनी गॅमा रेडिएशन, ई.एम.एस केमिकल यांच्या साहाय्याने मणिपूरमधील ब्लॅक राईस आणि काळ भात यांच्या उत्पादनाचा कालावधी कमी केला. भाताच्या रोपाची उंची केमी केली.

पान ९ वर >

ब्लॅक राईसवरील संशोधन

| वाण | मूळ गुणधर्म | संशोधनानंतर झालेले बदल |
|---|---|---|
| ब्लॅक राईस | उंची ५ फूट | उंची ३ ते ४ फूट |
| | कालावधी १४५ दिवस | १२० दिवस |
| | उत्पादन ३५.१३ ग्रॅम (प्रतिरोप) | १३५ ग्रॅम (प्रतिरोप) |
| काळ भात | मूळ गुणधर्म | संशोधनानंतर झालेले बदल |
| | उंची १४५ सें.मी. | ७० सें.मी |
| | कालावधी १३८ दिवस | कालावधी १२६ दिवस |
| | लोंब्यांचे प्रमाण कमी | लोंब्यांचे प्रमाण वाढले |





‘मणिपूर ब्लॅक राईस’ वाण.

# ‘मणिपुरी ब्लॅक राईस’ वर विद्यापीठात यशस्वी संशोधन

> पान १ वरून

परिणामी वाऱ्यामुळे किंवा लोंबी वजनाने पडून होणारे नुकसान कमी झाले. प्रत्येक रोपातून येणारे उत्पादनही वाढले.

पहिल्या टप्प्यातील परीक्षण राधानगरी येथील भात संशोधन केंद्रात यशस्वी झाले. येथील संशोधक डॉ. शैलेश कुंभार यांनी या वाणाच्या शास्त्रीय चाचण्या घेतल्या. पुढील चाचण्यांसाठी ते कर्जत येथील संशोधन केंद्रात पाठवण्यात आले आहे. तेथील चाचण्यांनंतर भविष्यात हे वाण शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होईल. वनस्पतीशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी रणजित लोंढे यांनी हे संशोधन केले आहे.

### ब्लॅक राईसची वैशिष्ट्ये

हे वाण मणिपूर येथील असून, त्याच्या रोपाची उंची पाच फुटांपर्यंत असते. या वाणाचा भात चिकट असून, तो चविष्ट असतो. आजारी व्यक्तीला औषध म्हणूनही ब्लॅक राईस दिला जातो. या वाणाचा आणि तयार होणाऱ्या भाताचा रंग काळा असतो.

“ देशी वाणाची गुणवत्ता नैसर्गिकपणेच अव्वल आहे. त्यांची चव, वास अन्य वाणांच्या तुलनेत उत्तम असतो; मात्र उत्पादन कमी असल्याने या वाणांकडे दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेऊन त्याचे मूळचे रंग, सुगंध, चव आदी गुणधर्म कायम ठेवून संशोधनाद्वारे या वाणाचे उत्पादन वाढवले आहे. संशोधनानंतर ब्लॅक राईस आणि काळ भात यांची उंची, कालावधी कमी होऊन उत्पादनात वाढ झाली आहे.

**- प्रा. डॉ. एन. बी.** गायकवाड; वनस्पतीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठात मिळणार फौंड्री तंत्रज्ञानाचे धडे

## पदविका अभ्यासक्रम सुरू; आयआयएफचा प्रस्ताव

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र अधिविभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेनतर्फे (आयआयएफ कोल्हापूर चॅप्टर) पदव्युत्तर स्तरावरील 'फौंड्री तंत्रज्ञान' हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असल्याची माहिती रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी आज दिली.

कोल्हापूर, सांगली परिसरात सुमारे ५०० फौंड्री आहेत. वाहन उद्योग, इंजिन ऑईल्ससाठी लागणारे विविध सुटे भाग आणि शेती अवजारांची निर्मिती या फौंड्री उद्योगातून तयार केला जातो. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल या उद्योगामध्ये होते. अलीकडे हा उद्योग कुशल मनुष्यबळाचा अभाव, नवनवीन तंत्रज्ञानाच्या जाणकारांची कमतरता यामुळे अडचणींना सामोरा जात आहे.

> फौंड्री क्षेत्रामध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सुवर्णसंधी आहे. या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू

म्हणूनच आयआयएफ कोल्हापूर चॅप्टरने पुढाकार घेऊन विद्यापीठाला अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव दिला. त्यानुसार विद्यापीठात हा अभ्यासक्रम सुरू केल्याची माहिती डॉ. सोनवणे यांनी दिली.

**विद्यार्थ्यांना कौशल्य, मार्गदर्शन**

या अभ्यासक्रमाची रचना नवीन शैक्षणिक धोरण -२०२० नुसार आहे. विद्यापीठ आणि फौंड्री उद्योगाच्या समन्वयातून तो विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
लोकमत

# फौंड्री तंत्रज्ञानातील पदविका अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रसायनशास्त्र अधिविभाग व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेनच्या वतीने पदव्युत्तर स्तरावरील ' फौंड्री तंत्रज्ञान ' हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात येत असल्याची माहिती रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनावणे यांनी दिली.

कोल्हापूर हे फौंड्री उद्योगासाठी देशभर प्रसिद्ध असून जवळपास ५०० हून अधिक फौंड्री उद्योग कोल्हापूर व जवळपासच्या जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत. दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल या उद्योगामध्ये होते. अलीकडे हा उद्योग कुशल मनुष्यबळाचा अभाव, नवनवीन तंत्रज्ञानाच्या जाणकारांची कमतरता यामुळे अडचणींना सामोरा जात आहे. म्हणूनच इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमेन (कोल्हापूर चॅप्टर) या संस्थेने पुढाकार घेऊन विद्यापीठाला अभ्यासक्रम सुरु करण्याचा प्रस्ताव दिला. त्यानुसार विद्यापीठात हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला.

या अभ्यासक्रमाची रचना नवीन शैक्षणिक धोरण -२०२० नुसार असून विद्यापीठ व फौंड्री उद्योग यांच्या समन्वयातून तो विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे. या अभ्यासक्रमामध्ये फौंड्री उद्योग व्यवसायाशी संबंधित नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान, स्टार्टअप्स इत्यादींचा समावेश केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
तरुण भारत

## शिवाजी विद्यापीठ

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. विद्या चौगुले, डॉ. कविता वड्राळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024

तरुण भारत

# साहित्यिक कृष्णात खोत यांचा कुलगुरू डॉ. शिर्केंकडून गौरव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून आणि कोल्हापूरचे सुपुत्र म्हणून आपणास मिळालेल्या यशाचा अतिशय अभिमान वाटतो, अशा शब्दांत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक कृष्णात खोत यांचा गौरव केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी खोत यांच्या फुलेवाडी येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. त्यावेळी ते बोलत होते. कृष्णात खोत यांच्या 'रिंगाण' कादंबरीला नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी खोत यांच्याशी 'रिंगाण'सह त्यांच्या अन्य साहित्यकृतींच्या अनुषंगाने चर्चा केली. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
पुण्यनगरी

# लेखक कृष्णात खोत यांची आज मुलाखत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात शुक्रवारी (दि. ५) सकाळी ११.३० वाजता साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'रिंगाण' या कादंबरीचे लेखक कृष्णात खोत तसेच या कादंबरीच्या इंग्रजी अनुवादक प्रा. माया पंडित यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारता येणार आहेत. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते लेखक व अनुवादक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तर यावेळी 'रिंगाण'वर होणाऱ्या चर्चासत्रात प्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, समीक्षक डॉ. रणधीर शिंदे आणि लेखक डॉ. रघुनाथ कडाकणे सहभागी होणार आहेत. साहित्यप्रेमींनी या कार्यक्रमात सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 JAN 2024
सकाळ

# विद्यापीठात आज 'लेखक आपल्या भेटीला'

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठात "लेखक आपल्या भेटीला" या कार्यक्रमात उद्या, शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजता साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त "रिंगाण" या कादंबरीचे लेखक कृष्णात खोत आणि या कादंबरीच्या इंग्रजी अनुवादक प्रा. माया पंडित यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारता येणार आहेत. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते लेखक व अनुवादक यांचा सत्कार होईल. पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
लोकमत

# लेखक कृष्णात खोत यांच्याशी आज संवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात आज शुक्रवारी सकाळी ११:३० वाजता साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त 'रिंगाण' या कादंबरीचे लेखक कृष्णात खोत तसेच या कादंबरीच्या इंग्रजी अनुवादक प्रा. माया पंडित यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारता येणार आहेत. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते लेखक व अनुवादक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी 'रिंगाण'वर होणाऱ्या चर्चासत्रात प्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. रणधीर शिंदे आणि लेखक व अनुवादक डॉ. रघुनाथ कडाकणे सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
05 JAN 2024
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करिअरसाठी संशोधनाचाही विचार करा

## डॉ. दीपक डुबल; शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : विद्यार्थ्यांनी नोकरी, व्यवसायाबरोबरच करिअरसाठी संशोधन क्षेत्राचाही विचार करावा. इंग्रजी भाषा आणि संवाद कौशल्यावर प्रभुत्व मिळवावे, असे आवाहन ऑस्ट्रेलियातील क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमधील प्रा. डॉ. दीपक डुबल यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानात त्यांनी 'उच्च शिक्षणातील आंतरराष्ट्रीय संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. डॉ. डुबल यांनी त्यांचा शैक्षणिक प्रवास, सध्याचे संशोधन आणि उपलब्ध असलेल्या संशोधन व उच्च शिक्षणातील विविध संधींवर प्रकाश टाकला. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी नवीकरणीय ऊर्जा निर्मिती व साठवण क्षेत्रातील नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांच्या संशोधनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ त्यांच्या क्षेत्रात मास्टर्स बनण्यासाठी नव्हे, तर प्रभुत्व मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी डॉ. डुबल यांचा परिचय करून दिला. भौतिकशास्त्र विभाग ज्ञान वाढवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले. प्रा. के. वाय. राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. उमेश चौगले यांनी आभार मानले.

05 JAN 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हजेरी भरल्यानंतरच ‘एलएलबी’ची परीक्षा


## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय; विद्यार्थी-प्राचार्यांसमवेत आज चर्चा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : हजेरीबाबतचा ७० टक्क्यांचा निकष पूर्ण केल्यानंतरच एलएलबीच्या तीन आणि पाचवर्षीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याचा निर्णय आज शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने तीन दिवसांपूर्वी विधी महाविद्यालयांना केलेल्या सूचनांप्रमाणेच निर्णय झाला.

अपुऱ्या हजेरीमुळे एलएलबी अभ्यासक्रमाचे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील सुमारे ७०० विद्यार्थी परीक्षा देण्यास अपात्र ठरले. त्यांनी विद्यापीठाने परीक्षा देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली. त्यावर या विद्यार्थ्यांना त्यांची पुढील सम सत्रासमवेत विषम सत्र मान्य होण्याइतकी हजेरी भरल्यास परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यानुसार विधी महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सूचना केली. मात्र, आम्हाला विनाअट आताच्या सत्रात परीक्षा देण्यास परवानगी देण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली. याबाबत निर्णय घेण्यासाठी विद्यापीठाने आज व्यवस्थापन परिषदेची बैठक घेतली. त्यात कायदेशीर मुद्यांवर चर्चा करण्यात आली. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या तरतुदीनुसार हजेरीची अट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही. पुढील सत्रात हजेरी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास परवानगी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यापूर्वी विधी महाविद्यालयांतील प्राचार्यांसमवेतही चर्चा करण्यात आली.

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकारी, विद्यार्थ्यांनी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, व्यवस्थापन परिषद सदस्य रघुनाथ ढमकले, अमरसिंह रजपूत यांच्यासमवेत सायंकाळी चर्चा केली. विद्यार्थ्यांनी सध्याच्या सत्रात परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याची मागणी केली. त्यांनी अपात्रतेबाबतची माहिती महाविद्यालयांतून वेळेत मिळाली नसल्याची तक्रार केली. त्याबाबत उद्या, शुक्रवारी विद्यार्थी, प्राचार्य यांच्यासमवेत एकत्रितपणे व्यवस्थापन परिषदेतील काही सदस्य चर्चा करणार आहेत.



### उन्हाळी सत्रात परीक्षा होणार

**व्यवस्थापन परिषदेच्या या निर्णयानुसार अपात्र विद्यार्थ्यांची हजेरी पूर्ण झाल्यानंतर मार्च-एप्रिलदरम्यान होणाऱ्या उन्हाळी सत्रातील विषम सत्रात परीक्षा घेण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांची शैक्षणिक नुकसान होणार नाही, याबाबतची दक्षता घेऊन परिषदेने निर्णय घेतला आहे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
लोकमत

# 'एलएल.बी.' विद्यार्थ्यांना हजेरीची अट कायम'

## विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अपुऱ्या हजेरीमुळे शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एलएल.बी. अभ्यासक्रमाचे ७०० विद्यार्थी परीक्षा देण्यास अपात्र ठरले असून, बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमाप्रमाणे हजेरीची अट पूर्ण केल्यानंतरच त्यांना परीक्षा देता येईल, असा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गुरुवारी घेतला.

या विद्यार्थ्यांची पुढील समसत्रासमवेत विषम सत्र मान्य होण्याइतकी हजेरी भरल्यास त्यांना परीक्षा देण्यास परवानगी देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने मंगळवारी घेतला होता. मात्र, विद्यार्थ्यांनी विनाअट आता सुरू असलेल्या सत्रातील परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याची मागणी केली होती. मात्र, ही मागणी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अमान्य करत मंगळवारी घेतलेला निर्णयच कायम केला.

वर्गातील अपुऱ्या हजेरीमुळे तीन आणि पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमाचे



जे विद्यार्थी परीक्षा देण्यास अपात्र ठरले आहेत त्यांचे सत्र मान्य होण्यासाठी अनुपस्थित किंवा उपस्थिती कमी असणाऱ्यांसाठी आवश्यक अध्यापनाच्या नियोजनाची कार्यवाही करण्याची सूचना विद्यापीठाने विधी महाविद्यालयांना केली आहे. अपात्र ठरलेल्या या विद्यार्थ्यांनी हजेरीच्या नियमांमध्ये शिथिलता देण्याची विनंती केली होती. मात्र, बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या तरतुदीनुसार हजेरीची अट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार नाही, त्यांची पुढील समसत्रासमवेत विषम सत्र मान्य होण्याइतकी हजेरी भरल्यास त्यांना परीक्षा देण्यास परवानगी देण्याचा निर्णय बैठकीत घेतला.

0 5 JAN 2024

जनसंपर्क कक्ष


सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरुष रायफल शूटिंग संघाला सुवर्णपदक

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे सुरू असलेल्या साउथ वेस्ट इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष रायफल शूटिंग संघाने सुवर्णपदक पटकावले.

संघाचे एकूण गुण १२४५ झाल्याने स्पर्धेतील सर्वोत्तम संघ म्हणून विद्यापीठाला घोषित करण्यात आले. संघात सुमेध सासने (४१५.५) व प्रतीक जोंग (४१५.२, दोघेही श्री लहू बाळा परितेकर महाविद्यालय, पणुरे), अवधूत साळुंखे (४१४.३, कॉमर्स कॉलेज) यांचा समावेश आहे.



कोल्हापूर : साऊथ वेस्ट इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत पुरुषांच्या रायफल शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

संघाला प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष

05 JAN 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ नेमबाज संघाला सुवर्ण

## पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत कामगिरी : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी

कोल्हापूर

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेच्या १० मीटर एअर रायफल शूटिंग प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने सुवर्णपदक मिळवले. अखिल भारतीय विद्यापीठ व कुरुक्षेत्र विद्यापीठ यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत ३५ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातून सुमेध सासने व प्रतिक जोंग (दोघे श्री. लहू बाळा परितेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी, पनुरे, ता पन्हाळा), अवधूत साळुंखे ( कॉमर्स कॉमर्स, कोल्हापूर) यांनी प्रतिनिधीत्व केले होते. त्यांनी सुवर्ण पदकाला गवसणी घालताना स्पर्धेच्या नियोजित १३०८ गुणांपैकी १२४५ गुणांची कमाई केली.



कोल्हापूर : पश्चिम-दक्षिण विभागीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ संघातील नेमबाजासोबत प्रशिक्षक प्रा. डॉ. निलेश पाटील व संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. धनंजय पाटील.

यामध्ये सुमेधच्या ४१५.५, प्रतिकच्या ४१५.२ तर अवधूतच्या ४१४.३ गुणांचा समावेश आहे. स्पर्धेतील सुवर्णपदकी कामगिरीमुळे शिवाजी विद्यापीठ संघाची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दरम्यान, या संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

संघाचे प्रशिक्षक म्हणून राधानगरी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. निलेश पाटील यांनी तर आजरा महाविद्यालय प्रा. डॉ. धनंजय पाटील यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. संघाला कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JAN 2024
पुढारी



कोल्हापूर : कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या साऊथ वेस्ट इंटर युनिव्हर्सिटी रायफल शूटिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने १,२४५ गुणांसह सुवर्ण पदक पटकाविले. संघातील सुमेध सासणे (दोघे लहू बाळा परितेकर महाविद्यालय, पणुरे) आणि अवधूत साळुंखे (डी. आर. के. कॉमर्स, कोल्हापूर) यांनी यशस्वी कामगिरी केली. सर्वांना प्रशिक्षक म्हणून डॉ. नीलेश पाटील, डॉ. धनंजय पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.